सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्राथमिक मान्यता दिलेल्या संस्थांसाठीच्या अटी व शर्ती-

१) सदर प्राथमिक मान्यता केवळ सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी असून कोणत्याही रूपाने उपप्रकल्प राबविण्यासाठीची मान्यता अथवा पूर्वसंमती नाही.

२) सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या समुदाय आधारित संस्थांचे सविस्तर प्रकल्प अहवाल,स्मार्ट प्रकल्पास उपलब्ध आर्थिक लक्षांक व प्रकल्पाच्या उद्दिष्टांची पूर्तता यावर सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता देणे अवलंबून असेल.

याशिवाय सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करतेवेळी खालील अटींची पूर्तता करणे अनिवार्य राहील.

३) स्मार्ट प्रकल्पातून समुदाय आधारित संस्थेमार्फत प्रस्तावित प्रकल्प किंमतीच्या अधिकतम ६०% पर्यंत अनुदान,व्यवहार्यता अंतर निधीच्या (Viability Gap Fund) स्वरुपात दिले जाईल.उर्वरित निधी संस्थेने स्वतः उभा करावयाचा आहे,यासाठी संस्था बँका व अन्य वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊ शकतील तथापि कर्ज घेणे बंधनकारक राहणार नाही.

४) फलोत्पादन पिकांच्या मुल्यसाखळी उपप्रकल्पासाठी प्रति समुदाय आधारीत संस्था, अनुदान मर्यादा एकुण प्रकल्प किंमतीच्या ६०% व अधिकतम रु. ३.०० कोटी असेल,सदर प्रकल्प अहवालात शीतगृह, पिकवण गृह या बाबी प्रस्तावित केल्यास त्याची अनुदानासाठी ग्राह्य धरली जाणारी अधिकतम क्षमता पुढीलप्रमाणे असेल.

अ) शितगृह- (Cold Storage)-अधिकतम १००० मे. टन.

ब) पिकवण गृह (Ripening Chamber) – अधिकतम १५० मे.टन

क) पुर्व शितकरण गृह (Pre Cooling Chamber)- ५० मे.टन.

५) कापूस जिनिंग-प्रेसिंग उपप्रकल्पासाठी प्रती सिबिओ अनुदान मर्यादा प्रकल्प किंमतीच्या ६० % अधिकतम रु.३.०० कोटी असेल.सदर उपप्रकल्पात फक्त १८ DR किंवा २४ DR जिनिंग-प्रेसिंगसाठी अनुदान देय राहील.यापेक्षा कमी DR च्या जिनिंग व्यवहार्य नसल्याने त्यांना अनुदान देय राहणार नाही म्हणजेच त्यांचे उपप्रकल्प मंजूर करण्यात येणार नाहीत.

६) फलोत्पादन पिका व्यतिरिक्त अन्य शेत पिकांच्या मुल्यसाखळी उपप्रकल्पासाठी प्रति समुदाय आधारीत संस्था, अनुदान मर्यादा प्रकल्प किंमतीच्या ६०% व अधिकतम २.०० कोटी असेल. या प्रकल्प अहवालात गोदाम बांधकाम प्रस्तावित केल्यास त्याची अनुदानासाठी ग्राह्य धरली जाणारी अधिकतम साठवण क्षमता २००० मे. टन असेल.

७) स्मार्ट प्रकल्पातंर्गत फलोत्पादन पिकाच्या उपप्रकल्पाला जास्तीत जास्त रु. ३.०० कोटी आणि अन्य शेती पिकाच्या उपप्रकल्पाला जास्तीत जास्त रु. २.०० कोटी अनुदान देय आहे. तसेच ज्या पायाभुत सुविधेला/मालमत्तेला अगोदर अनुदान दिलेले आहे त्याला परत अनुदान दिले जाणार नाही.

८) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये पिक काढण्योत्तर पायाभुत सुविधासाठींच्या (Post Harvest Infrastructure) बाबींवर किमान प्रकल्प खर्चाच्या ७०% खर्च प्रस्तावित करावा. (Post-Harvest Infrastructure includes post-harvest machinery, primary processing cleaning, grading, secondary processing, tertiary processing, packaging etc.) तसेच गुणवत्तापुर्ण उत्पादनासाठीचे तंत्रज्ञान आणि अन्य पिक काढणीपुर्व सोयी सुविधांसाठी अधिकतम एकुण प्रकल्प खर्चाचा २५% खर्च प्रस्तावित करता येईल. याबरोबरच प्रकल्प कार्यान्वयन खर्च ५ % प्रस्तावित करता येईल.

९) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये केवळ नव्याने उभ्या करावयाच्या (प्रकल्प अहवाल मंजूरीनंतर राबवावयाच्या) बाबींचा समावेश असावा.

१०) सविस्तर प्रकल्प अहवालात प्रस्तावित घटकांची अनुदान परिगणना प्रचलित शासकीय योजनांच्या मापदंडानूसार केली जाईल. उदा. फलोत्पादन पिकांच्या प्रकल्पासाठी केंद्र पुरस्कृत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत मापदंडानूसार अनुदानाची परिगणना करण्यात येईल आणि गोदाम बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे मापदंड ग्राह्य धरण्यात येतील. सर्व प्रकारच्या औजारांसाठी केंद्र पुरस्कृत कृषी अभियांत्रीकीकरण उपअभियानातील मापदंड ग्राह्य धरण्यात येतील. सर्व प्रकारच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संबंधित जिल्ह्यासाठीचे अनुसूचित दर वापरून (DSR) सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे अभिप्रेत आहे. सविस्तर प्रकल्प अहवालात प्रस्तावित बाबींसाठी कोणत्याही शासकीय योजनेत मापदंड उपलब्ध नसतील अशा बाबींसाठी व अन्य अपवादात्मक परिस्थितीत स्मार्ट प्रकल्पामार्फत मापदंड निश्चित करण्यात येतील.

११) स्मार्ट प्रकल्पातील उपप्रकल्प/सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये मशिनरी व त्यासाठी लागणारे शेड याबाबत खर्चाचे प्रमाण अनुदानासाठी निश्चित करताना गोदामाची मागणी असल्यास शेडची किंमत ही जास्तीत जास्त मशीनरीच्या किंमती एवढी असावी. शेडचे बांधकाम अंदाजपत्रक SSR नुसार असावे. गोदाम हा स्वतंत्र घटक असल्याने यास बांधकाम : मशिनरीचे प्रमाण लागू राहणार नाही. तथापि गोदामाची स्वतंत्र मागणी नसल्यास मशिनरी व्यतिरिक्त कच्चा माल अथवा पक्का माल तात्पुरता साठविण्यासाठी अतिरिक्त शेडची मागणी केल्यास त्याबाबतची आवश्यकता तपासून आणि SSR नुसार बांधकाम करण्याच्या अटीवर असे शेड मंजूर करता येईल.

१२) उपरोक्त पद्धतीने सविस्तर प्रकल्प अहवाल सनदी अभियंता(Chartered Engineers),सनदी लेखापाल यांच्या मदतीने समुदाय आधारित संस्थांनी तयार करावेत आणि अशा प्रकल्प अहवालांना आणि त्यात प्रस्तावित बाबींना स्वतंत्र तांत्रिक मान्यतेची आवश्यकता राहणार नाही. तथापि प्रकल्पामार्फत सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी करण्यात येईल.

१३) प्रकल्पाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी दिलेल्या नमुन्यात केवळ माहिती सादर करणे म्हणजे सविस्तर प्रकल्प अहवाल होत नाही. सनदी लेखापाल व सनदी अभियंता यांच्या सहाय्याने प्रकल्पाची आर्थिक व तांत्रिक व्यवहार्यता तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा लागेल. अशा सविस्तर प्रकल्प अहवालांचे विशिष्ट निकषांच्या आधारे गुणांकन करून केवळ स्पर्धाक्षम सविस्तर प्रकल्प अहवालांची उपलब्ध भौतिक व आर्थिक तरतुदीच्या अधीन राहून अतिम मंजुरीसाठी निवड केली जाईल.

१४) संस्थेच्या संचालक मंडळात एका कुटुंबातील एकापेक्षा जास्त संचालक नसावेत.

१५) संस्थेने प्रस्तावित केलेल्या एकुण प्रकल्प खर्चाच्या किमान ५% भाग भांडवल (Paid Up Capital) संस्थेकडे जमा असावे.

अ) प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा, कृषि, पशुसंवर्धन आणि VSTF यांच्या समुदाय आधारित संस्थांबाबत चर्चा होवून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला. **"समुदाय आधारीत संस्थेचे जमा भाग भांडवल (Paid up Capital) प्रस्तावित प्रकल्प किंमतीच्या ५% किंवा रु.५.०० लाख यापेक्षा जे कमी असेल ते असल्यास सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता द्यावी तथापि प्रकल्पासाठी देय अनुदानाचा पहिला हप्ता मुक्त करण्यापुर्वी Paid up Capital प्रकल्प किंमतीच्या किमान ५% असावे."**

आ) प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा, माविम व MSRLM यांच्या समुदाय आधारित संस्थांबाबत चर्चा होवून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**"समुदाय आधारीत संस्थेचे जमा भाग भांडवल (Paid up Capital) कितीही असले तरी सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता द्यावी. तथापि प्रकल्पासाठी देय अनुदानाचा पहिला हप्ता मुक्त करण्यापुर्वी Paid up Capital प्रकल्प किंमतीच्या ५% असावे."** माविम CMRC ची नोंदणी Trust Act व सोसायटी कायद्यातंर्गत असल्याने Trust Fund or Corpus Fund प्रकल्प किंमतीच्या ५% असावा.

१६) संस्थेस (FPC) होणाऱ्या नफ्यापैकी किमान २५% नफा भागधारकांना लाभांश स्वरूपात थेट लाभ हस्तांतरणाने (Direct Beneficiary Transfer- DBT) वाटप करणेबाबत लेखी हमी व सर्वसाधारण सभेचा ठराव सादर करावा.प्रकल्प मंजुरीनंतर नफा झाल्यास अशा लाभांशाचे वरीलप्रमाणे वाटप झाल्याशिवाय स्मार्ट प्रकल्पातून द्वितीय व तृतीय अनुदान हप्ता वितरीत होणार नाही.

१७) सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करतेवेळी समुदाय आधारित संस्थेच्या भागधारकांमध्ये प्रकल्प अंमलबजावणी कालावधीमध्ये अनुदानाचा अंतिम हप्ता मिळणेपूर्वी संस्थेमध्ये खालीलप्रमाणे भागधारकांचे प्रमाण करण्यात येईल असे लेखी अभिवचन द्यावे लागेल .

अ) अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी-८०%

ब) महिला शेतकरी-३०%

क) अनुसूचित जाती व जमाती — जिल्ह्यातील शेतकरी संखेच्या प्रमाणात

ड)संचालक मंडळात महिलांची संख्या किमान-२०%

१८)याशिवाय स्मार्ट प्रकल्पाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडा,प्रकल्पाची संपादन पुस्तिका,प्रकल्पाची वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका यामधील तरतुदी,अटी व शर्तीनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल असावा.

(कौस्तुभ दिवेगांवकर, भा.प्र.से.)
प्रकल्प संचालक, स्मार्ट, पुणे